आर बी आय /२००४-०५/३१५
डीसीएम (पीएलजी) क्र. जी-३१/१०.०३.००/२००४-०५

डिसेंबर २७,२००४

रोख तिजोऱ्या (करन्सी चेस्ट) ठेवणाऱ्या बँका - यादीप्रमाणे

प्रिय महोदय/महोदया,

**सुट्या नाण्यांचा अस्वीकार**

कृपया आम्ही आपणास पाठविलेल्या पत्र डीसीएम (आरएमएमटी) क्र. ११८१/११.३७.०१/२००३-०४ दिनांक एप्रिल ५,२००४ चा संदर्भ घ्यावा. त्यात आम्ही आपणास बँकेच्या शाखांनी सुट्या नाण्यांचा स्वीकार करण्यासंबंधाने निदेश /सूचना दिल्या होत्या. दिनांक नोव्हेंबर २२,२००४ रोजी, चेन्नई येथील रिझर्व बँक स्टाफ़ कॉलेजमध्ये घेतलेल्या प्रचालन (इश्यु) कार्यालयांच्या प्रादेशिक प्रधान अधिकाऱ्यांच्या आणि तिजोऱ्या (चेस्ट) ठेवणाऱ्या बँकांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परिषदेत, इतर बाबींबरोबर, वाणिज्य बँकाच्या शाखांकडून सुटी नाणी न स्वीकारल्या गेल्याने जनतेला होत असलेल्या त्रासांवर भर देण्यात आला.

२) आमच्याकडे अजूनही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष --- अशा नाण्यांचा अस्वीकार केला जात असल्याच्या तक्रारी येत असल्याने, आम्ही पुनः एकदा आपणास सूचित करत आहोत की आपण आपल्या सर्व शाखांना खात्यात भरण्यासाठी किंवा विनीमयासाठी काऊंटर्सवर देण्यात आलेली सर्व मूल्यांची सुटी नाणी स्वीकारण्याचे निदेश द्यावेत. आम्ही आशा करतो की नाण्यांची विनिमय-सुविधा आणि स्वीकार याबद्दलची जनतेसाठी सूचना आपण शाखांच्या आत, शाखेच्या बाहेर परिसरात प्रदर्शित केली असेल.

३)काउंटर्सवर दिली गेलेली नाणी हाताळणे सोपे जावे म्हणून, विशेषतः मोठ्या संस्थामध्ये / मंदिरांच्या शहरात /शाखेच्या परिसरात ''सॉर्टींग मशीन्स'' बसवण्याबाबत विचार आपण करु शकता. पूर्वीच सांगितल्याप्रमाणे ॲल्युमिनियमची ५, १० व २० पैशांची नाणी, अल्युमिनियम ब्रॉंझची १०पैशाची नाणी, स्टेनलेस स्टीलची १० पैशांची नाणी, आणि क्युप्रोनिकेलची २५ पैसे,५० पैसे आणि रु.१ ची नाणी, अस्तित्वात असलेल्या पध्दतीनुसार, मुंबई /कोलकाता /हैदराबाद येथील भारत सरकारच्या टाकसाळीत पाठविता येऊ शकतात. स्टेनलेस स्टीलची २५ पैसे, ५० पैसे व रु. १ ची नाणी आणि क्युप्रोनिकेलची रु.२ व रु. ५ ची नाणी पुनः प्रसृत करण्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत. तथापि या नाण्यांच्या मागणीचा अभाव असल्यास, त्या मंडळाच्या विभागाशी नाणी पाठविण्यासाठी संपर्क केला जावा.

४. आपणास पुनः विनंती करण्यात येत आहे की, जनतेची अडचण होऊ नये म्हणून आपण आपल्या सर्व शाखांना, कोणत्याही हरकतीशिवाय जनतेकडून सुटी नाणी स्वीकारण्याच्या सूचना द्याव्यात

५. कृपया पोच द्यावी व याबाबतीत आपण केलेली कृती आम्हाला कळवावी.

आपला विश्वासू
( यु एस पालीवाल )
मुख्य महाव्यवस्थापक

List of Banks to whom letter DCM (Plg) No. G-31 /10.03.00/2004-05 dated 27th December 2004, is addressed.

| Name of the Banks | Name of the Banks |
|---|---|
| **Public Sector Banks** | **Private Sector and Others** |
| 1 Allahabad Bank | 1 Bank of Punjab Ltd. |
| 2 Bank of Baroda | 2 The Bank of Rajasthan Limited |
| 3 Bank of Maharashtra | 3 Catholic Syrian Bank Ltd., |
| 4 Central Bank of India | 4 The Dhanalakshmi Bank Limited |
| 5 Dena Bank | 5 The Federal Bank Limited |
| 6 Indian Bank | 6 HDFC Bank Ltd |
| 7 Punjab & Sind Bank | 7 ICICI Bank Limited |
| 8 State Bank of India | 8 IDBI Bank Ltd., |
| 9 Andhra Bank | 9 The Jammu & Kashmir Bank Limited |
| 10 Canara Bank | 10 The Karnataka Bank Ltd., |
| 11 Bank of India | 11 The Karur Vysya Bank Limited |
| 12 Corporation Bank | 12 The Lakshmi Vilas Bank Ltd., |
| 13 Indian Overseas Bank, | 13 The South Indian Bank Ltd., |
| 14 Oriental Bank of Commerce, | 14 Tamilnad Mercantile Bank Ltd., |
| 15 Punjab National Bank, | 15 UTI Bank Ltd., |
| 16 Syndicate Bank, | 16 The Ing Vysya Bank Limited |
| 17 UCO Bank | 17 Standard Chartered Bank |
| 18 United Bank of India, | 18 Rajasthan C0-op Bank Ltd., |
| 19 Union Bank of India, | |
| 20 Vijaya Bank | |
| 21 State Bank of Bikaner & Jaipur | |
| 22 State Bank of Patiala, | |
| 23 State Bank of Indore | |
| 24 State Bank of Travancore | |
| 25 State Bank of Hyderaba | |
| 26 State Bank of Mysore, | |

| | |
|---|---|
| 27 State Bank of Saurashtra | |
| | |
| | |